**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम: प्रेरक प्रवेश उपक्रम (Entry Point Activities : EPA): अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एपाव्यका २०१२/प्र. क्र.१३२ /जल-८,

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई -४०००३२.

तारीख: ९ मे, २०१३.

**वाचा —**

**शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/ वित्त -९(३३), दि.९ फेब्रुवारी, २००९**

**प्रस्तावना —**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पर्जन्यधारीत क्षेत्र प्राधिकरणाने पाणलोट विकास कार्यक्रमाकरीता सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ निर्गमित केल्या आहेत. सदर सूचना दिनांक १ एप्रिल, २००८ पासून लागू करण्यात आल्या आहेत. या सामाईक मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या सर्व पाणलोट विकास कार्यक्रमांना लागू आहेत. या सूचनांना अनुसरून केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) ही योजना सन २००९-१० पासून सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यास सन २००९-१० मध्ये ९.९६ लाख हेक्टर, सन २०१०-११ मध्ये १६.१४ लाख हेक्टर , सन २०११-१२ मध्ये ९.३१ लाख हेक्टर व सन २०१२-१३ मध्ये ५.२७ लाख हेक्टरच्या अशा एकूण ९४८ प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. या तिन्ही प्रकल्पांची एकूण किंमत रू. ५१५५.६७ कोटी इतकी आहे. सध्या सदर योजना राज्यातील ७०९८ ग्रामपंचायतीत व एकूण ९५०३ गावांमध्ये राबविण्यात येत आहे. पुढील ५ वर्षातही राज्यास या योजनेंतर्गत नवीन प्रकल्प मंजूर होणार

आहेत. हे प्रकल्प विहीत कालमर्यादेत पूर्ण होणे आवश्यक असल्याने ते पूर्ण करण्यासाठी सर्व स्तरावरून यथोचित प्रयत्न होणे आवश्यक आहे.

२. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर प्रधान सचिव (जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली वसुंधरा राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची स्थापना करण्यात आली आहे. या यंत्रणेवर आयुक्त (कृषि) हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) [पूर्वीचे जिल्हा पाणलोट विकास युनिट (DWDU)] स्थापन करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे WCDC चे सह अध्यक्ष आहेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी त्याचे सदस्य सचिव तथा प्रकल्प व्यवस्थापक आहेत. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून बहुंताशी ठिकाणी तालुका कृषि अधिकारी तर काही ठिकाणी उपसंचालक, सामाजिक वनीकरण, वन विभाग व स्वयंसेवी संस्था (VOs/NGOs) कार्यरत आहेत. गावपातळीवर पाणलोट समिती कार्यरत असून पाणलोट समितीमार्फत जलसंधारण व उपजीविका उपक्रमाची कामे करण्यातयेतात.

३. सामाईक मार्गदर्शक सूचनेच्या परिच्छेद ८.१ मध्ये प्रेरक प्रवेश उपक्रम घेण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेची विश्वमसनियता प्रस्थापित करणे व गाव समूहाबरोबर सलोख्याचे संबंध निर्माण करणे, योजनेस प्रसिध्दी, वातावरण निर्मिती आणि जाणीव जागृती व योजनेत लोकांचा अधिक सहभाग वाढविण्यासाठी प्रेरक प्रवेश उपक्रम राबविण्यात यावेत असे नमूद आहे.

४. सद्य:स्थितीत प्रेरक प्रवेश उपक्रमासाठी प्राप्त होणारा निधी जास्त प्रमाणात अखर्चित आहे. सदर उपक्रमांवर खर्चास गती व एकंदर योजनेची प्रगती राखण्यासाठी, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सन २००९-१०, २०१०-११ , २०११-१२ व २०१२-१३ मध्ये मंजूर झालेल्या प्रकल्पांतील गाव विकासाशी संबंधित, गावांच्या निकडीची प्रेरक प्रवेश उपक्रम कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

५. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमात प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकावर ४ टक्के प्रमाणे रु. १७५.८८ कोटी निधी प्राप्त झाला असून सर्व निधी खर्च होणे अपेक्षित होते. परंतु मार्च,२०१३ पर्यंत या घटकावर रु.९९.१७ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २००९-१० च्या बॅचमध्ये हे खर्चाचे प्रमाण ८० टक्के (रु.४८.४२ कोटी पैकी रु.३८.९७ कोटी खर्च) तर सन २०१०-११ च्या बॅचमध्ये ५८ टक्के एवढा खर्च झालेला आहे. (रु.८०.९१ कोटी पैकी रु.४६.५८ कोटी खर्च ) व सन २०११-१२ च्या बॅचमध्ये २९ टक्के एवढा खर्च (रु.४६.५५ कोटी पैकी रु. १३.६२ कोटी खर्च) झालेला आहे. एकंदरीत खर्चाची टक्केवारी ५६ टक्के आहे. तसेच एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यास सुरुवात होऊन तीन वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्यामानाने या योजनेतील प्रत्येक घटकावरील खर्च अपेक्षेपेक्षा कमी आहे. तेव्हा सर्व घटकावरील खर्चाचा वेग वाढविण्याची आवश्यकता असल्याचे केंद्र शासनाने निदर्शनास आणून दिलेआहे.यापूर्वी वसुंधरा राज्यस्तरीय नोडल यंत्रणेने तसेच शासन स्तरावरुन प्रेरक प्रवेश उपक्रम अंमलबजावणीसाठी वेळेवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. परंतु तरीही प्रत्यक्ष दिलेल्या क्षेत्रीय भेटीमध्ये काही ठिकाणी त्याची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत शासन स्तरावरुन सविस्तर सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय—**

सामाईक मार्गदर्शक सूचनेच्या परिच्छेद ८.१ मध्ये प्रेरक प्रवेश उपक्रम घेण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेची विश्‍वसनियता प्रस्थापित करणे व गांव समूहाबरोबर सलोख्याचे संबंध निर्माण करणे, योजनेस प्रसिध्दी, वातावरण निर्मिती आणि जाणीव जागृत्ती व योजनेत लोकांचा अधिक सहभाग वाढविण्यासाठी प्रेरक प्रवेश उपक्रम

राबविण्यात यावेत असे नमूद आहे. यामध्ये गावातील सामुहिक नैसर्गिक साधनसंपत्तीचे पुनरूज्जीवन, कृषि आधारीत कार्यक्रम, पाण्याच्या स्त्रोताचे बळकटीकरण, अपारंपारिक ऊर्जा अशा व इतर उपक्रमांचा समावेश आहे.

प्रेरक प्रवेश उपक्रमासाठी संबंधित गावाच्या मंजूर असलेल्या प्रकल्प मूल्याच्या ४ टक्के निधी खर्च करण्याची मर्यादा आहे. यापेक्षा जास्त खर्च करावयाचा असल्यास त्या गावातील लोकवर्गणीतून काही रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. प्रेरक प्रवेश उपक्रमासंदर्भात दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेच्या झालेल्या १५ व्या बैठकीत घ्यावयाच्या उपचारांना / कामांना मान्यता दिलेली आहे त्याची सूची **(परिशिष्ट- अ)** सोबत जोडली आहे. त्यानुसारच कामे हाती घेण्यात यावीत.

**अंमलबजावणी कार्यपध्दत :**

१. केंद्र शासनाने प्रकल्पास मंजुरी दिल्यानंतर प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांनी त्यांचे क्षेत्रीय कर्मचारी (कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक ) व पाणलोट विकास पथकातील सदस्य यांच्या सहाय्याने मंजूर पाणलोट प्रकल्पातील गावांमध्ये गाव समूहाबरोबर चर्चा करून त्यांच्या सामाजिक प्रश्नांवर / गरजेवर आधारित प्रेरक प्रवेश उपक्रम निश्चित करतील.

२. परिपत्रकासोबतच्या सूचीत **(परिशिष्ट- अ)** नमूद प्राथम्यक्रम ठरवून एकूण ५ ते ६ उपचारांना / ग्रामसभेच्या बैठकीत मान्यता घ्यावी . ज्या वेळेस प्रथम्यक्रमानुसार पहिले काम करणे शक्य नसल्यास क्रमानुसार नंतरच्या कामाची अंमलबजावणी करावी. अशी कार्यपध्दती अनुसरावी. जेणेकरून पहिल्यापासून कार्यपध्दती अवलंबावी लागणार नाही व कालापव्यय टळेल.

३. अशा प्रकारे निश्चित केलेल्या उपक्रमांच्या यादीला प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांनी जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता घ्यावी.

४. त्यानुसार प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांनी त्या प्रेरक प्रवेश उपक्रम कामांचे नियोजन व आवश्यकतेनुसार अंदाजपत्रके तयार करावीत.

५. प्रेरक प्रवेश उपक्रमासाठी मार्गदर्शक सूचनानुसार गावनिहाय एकूण उपलब्ध निधी (प्रकल्प मूल्याच्या ४ टक्के निधी) प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा स्तरावर ठेवून सदर कार्यक्रम राबवावा. त्यानुसार गावनिहाय प्रकल्प मूल्याच्या ४ टक्के निधीच्या मर्यादेत राहून प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांना खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

६. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ग्रामसभेने ठरवून दिलेल्या प्रेरक प्रवेश उपक्रमाच्या कामांची अंदाजपत्रके आवश्यकतेनुसार तज्ञ यंत्रणेच्या मदतीने तयार करून त्यांना तांत्रिक मंजुरी देवून पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणे पंचायत समितीच्या / जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागांच्या मदतीने करण्यात यावी.

७. प्रेरक प्रवेश उपक्रमाची कामे पार पाडताना गावातील प्रती कुटुंब दोन मनुष्यदिनाचे श्रमदान करणे अथवा श्रमदानाच्या मूल्याइतकी रक्कम पाणलोट विकास निधी च्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे.

८. प्रकल्प मूल्याच्या ४ टक्के रक्कमे पेक्षा जास्त रक्कमेची कामे प्रस्तावित केली असल्यास लागणारा अतिरिक्त निधी लोकवर्गणीतून भागविण्यात यावा अथवा अभिसरण तत्वाने (Convergence) इतर योजनेतून उपलब्ध करता येईल.

९. प्रेरक प्रवेश उपक्रमांमध्ये पाणलोट विकासासाठी सहाय्यभूत होतील अशी कामे प्रामुख्याने प्रस्तावित करावीत.

१०. काम केलेल्या ठिकाणी काम करणा-या यंत्रणेचे नाव , IWMP प्रकल्प क्रमांक, केंद्रीय भूसंसाधन विभाग तसेच जलसंधारण विभागाचे नाव, प्रेरक प्रवेश उपक्रम कामाची किंमत व बांधकाम देखभाल दुरुस्तीचा कालावधी , अक्षांश- रेखांश इत्यादी माहिती एका फलकावर नमूद करण्यात यावी.

११. **प्रेरक प्रवेश उपक्रमामध्ये कामे निवडताना पायाभूत सुविधांमध्ये खालील प्राधान्य क्रमानुसार कामे घ्यावीत. १) गुणवत्ता वृद्धीची कामे (परिशिष्ट - अ) २) नवीन कामे (परिशिष्ट - अ) यासाठी ग्रामपंचायतीच्या सेवा वापरण्यास प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना मुभा (Freedom) देण्यात येत आहे.**

१२. ग्रामसभेने निश्चित केलेल्या प्रेरक प्रवेश उपक्रमातील पायाभूत सुविधांमध्ये **१) गुणवत्ता वृद्धीची कामे व २) नवीन कामे** ग्रामपंचायती मार्फत राबविण्यास प्राधान्य राहिल. यासाठी ग्रामपंचायतीच्या सेवा उपलब्ध करून घेण्याचा पर्याय प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना उपलब्ध करण्यात येत असून सदर उपक्रम राबविण्यास ग्रामपंचायत व पाणलोट समितीचे सहकार्य घेण्यात यावे.

**अ) गुणवत्ता वृद्धीची कामे :**

**गावामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून बांधलेली समाजमंदीरे, सांस्कृतिक सभागृहे, सभामंडप, शाळा, अंगणवाड्या व ग्रामपंचायत कार्यालये यासारख्या सार्वजनिक इमारतीत विद्युत व्यवस्था, बैठकीसाठी फर्निचर व स्वच्छतागृह बांधणे व दुरूस्ती देखभाल यासारखी गुणात्मक वृध्दींची (Value Addition) कामे घेण्यास प्राथम्य क्रम राहिल.**

**(परिशिष्ट - अ)** : मा.प्रधान सचिव यांचे पत्र क्र.एपाव्य २०११/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक २१ नोव्हेंबर, २०११.

**ब) नवीन कामे :** नवीन कामे सोबतच्या **परिशिष्ट- अ** मध्ये नमूद करण्यात आली आहेत. प्रेरक प्रवेश उपक्रमांमध्ये नवीन इमारतीचे बांधकाम, सिमेंटचे रस्ते या सारख्या जास्त खर्चाच्या बाबीचा शक्यतो समावेश करू नये.

**पायाभूत सुविधा १) गुणवत्ता वृद्धीची कामे व २) नवीन कामे : कार्यपध्दती**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त - ९(३३), दि.९ फेब्रुवारी, २००९ नुसार रु. ५०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु .१०.०० लक्ष पर्यंत व रु. ५०,००१/- पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना रु . १५.०० लक्ष पर्यंतचे विकास कामे करण्यास विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून शासनाने मान्यता दिलेली आहे. जेणेकरून ग्रामपंचायतीच्या हद्दीतील/अखत्यारितील गुणवत्ता वृद्धीची कामे व नवीन कामे , ग्रामपंचायतीना अंमलबजावणीसाठी दिल्यास कामांना गती येईल व कामे अधिक गुणवत्तापूर्ण होतील.

ग्रामसभेने मंजूर केलेल्या गुणात्मक वृध्दींच्या (Value Addition) व नवीन कामांबाबत ग्रामपंचायतीच्या सेवा उपलब्ध करून घेण्याचा पर्याय प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण यांना उपलब्ध करून देण्यात येत असून सदर उपक्रम ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यचे ठरल्यास काम करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी.

१) **तांत्रिक सहाय्य:** प्रेरक प्रवेश उपक्रमाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे त्यांना तांत्रिक मंजुरी घेऊन पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेकामी ग्रामपंचायतीने पंचायत समितीच्या/ जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांचे म्हणजेच कनिष्ठ अभियंता/ उप अभियंता/ कार्यकारी अभियंता यांचे मार्गदर्शन व सहाय्य घ्यावे.

२) **प्रशासकीय मान्यता** : अशा प्रकारे निश्चित केलेल्या उपक्रमांच्या यादीला प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांनी जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता घ्यावी व तसे ग्रामपंचायतीस व पाणलोट समितीस कळवावे .

३) **जाहिर निविदा :** ज्या ग्रामपंचायतीकडे अवजारे वा यंत्र नसतील वा भाड्याने घेणे शक्य नसल्यास अशा ग्रामपंचायतींनी सदरचे घेतलेले काम मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते , बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था व स्थानिक मक्तेदार यांच्याकडून जाहीर निविदा मागवून विहित पध्दतीनुसार करून घ्यावे.

४) **मोजमाप पुस्तके :** झालेल्या कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तकात घेणे , देयके तयार करणे ही कामे पंचायत समितीचे कनिष्ठ अभियंता करतील. कामाच्या नोंदीनुरुप देयकांची अदायगी ग्राम पंचायत करील.

५) **हिशेब :** याबाबतचे हिशेब ग्रामपंचायतीने पाणलोट समितीस, तसेच गट विकास अधिकाऱ्यामार्फत प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणास व पाणलोट समितीने प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणास द्यावेत.

६) **कामाचा दर्जा :** ह्या कामांची गुणवत्ता व संनियंत्रण यांची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीची राहिल. गुणवत्ता वृद्धी व नवीन कामांचा दर्जा उच्च राखण्याबाबत प्रकल्प कार्यान्वयन

अभिकरणाकडील पाणलोट विकास पथकातील अभियंता, पंचायत समितीचे कनिष्ठ अभियंता व गट विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(७) **ग्रामसभेमध्ये माहिती देणे:** ग्रामपंचायत प्रत्येक ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची माहिती सादर करेल.

**क) साहित्य खरेदी :**

१. **साहित्य खरेदी : ही बाब निम्न प्राधान्याची (Low Priority) राहिल.** अत्यावश्यक परिस्थितीत तथा ग्रामसभेने निश्चित केलेल्या उपक्रमाची/ साहित्याची (परिशिष्ट - अ), खरेदी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाने करण्यास मान्यता आहे.

२. प्रेरक प्रवेश उपक्रमांच्या साहित्याची खरेदी करताना केंद्र व राज्य शासनाच्या दर करारानुसार प्राधान्याने करण्यात यावी.

३. ज्या बाबींसाठी दर करार झालेले नसतील अशा बाबी राबविताना विहीत खरेदी पध्दतींचा अवलंब करूनच कार्यवाही करावी.

४. तसेच विक्रीपश्चात सेवांचा (Follow up Services) माध्यमातून वार्षिक देखभाल व हमी कालावधीसाठी (Warranty Period) दर करारात प्रस्तावित केलेली किंवा एकूण रकमेच्या १० टक्के यापैकी जास्त असेल त्या रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी घेणे बंधनकारक राहिल.

५. गावनिहाय प्रेरक प्रवेश उपक्रमांसाठी मंजूर असलेल्या रक्कमे इतक्या मर्यादेत आवश्यक बाबींची विहीत पध्दतीने खरेदी करण्याचे पूर्ण अधिकार प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांना राहतील.

६. सौर पथदिवे दर करारानुसार खरेदी करताना ते दर करारात दिलेल्या प्रमाणकांनुसार (Specifications) योग्य दर्जाचे असल्याबाबतची तपासणी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) या संस्थेच्या स्थानिक प्राधिकऱ्याकडून करून घ्यावी त्यानंतरच देयक अदा करावे.

७. सौर पथदिवे या बाबीवर कोणत्याही गावासाठी प्रेरक प्रवेश उपक्रमासाठी देय होणाऱ्या रकमेच्या २५% पेक्षा जास्त रक्कम प्रस्तावित/ खर्च करू नये.

८. व्यायामशाळेतील महाग उपकरणे, भजनी मंडळासाठी साहित्य खेरदी, सामुदाईक भोजनासाठी साहित्य खरेदी या सारख्या बाबींवर फार मोठया प्रमाणावर खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

९. तसेच सर्व ठिकाणी पुरवठादार संस्थेचे नाव व दूरध्वनी क्रमांक, IWMP प्रकल्प क्रमांक, केंद्रीय भूसंसाधन विभाग व जलसंधारण विभागाचे नाव, प्रेरक प्रवेश उपक्रम कामाची किंमत, काम केल्याचा दिनांक व देखभाल दुरुस्ती कराराचा कालावधी, याबाबत संबंधिताचा दूरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती एका फलकावर नमूद करण्यात यावी.

**प्रेरक प्रवेश उपक्रमांतील साहित्य देखभालीसाठी करारनामा :**

१. सौर पथ दिवे व व्यायामशाळा साहित्य (मशीन) बसविण्याचा उपक्रम हाती घेताना प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा, पुरवठादार संस्था आणि पाणलोट समिती या तीन संस्थामध्ये पाच वर्षाच्या देखभाल व दुरूस्ती बाबतचा करारनामा (Tripartite Agreement) करून घ्यावा.

२. प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत घेतलेल्या बाबींची देखभाल करण्याबाबत संबंधित संस्थेशी करारनामा करून घ्यावा. उदा.अभ्यासिका, प्रयोगशाळा उपकरणे, या बाबींच्या देखभालीसाठी संबंधित शाळा / विद्यालय यांचेशी करारनामा करावा व अन्य साहित्यांच्या बाबतीत त्या त्या यंत्रणेशी करारनामा करावा.

**साहित्य वापराबाबत प्रशिक्षण :**

व्यायामशाळेतील साहित्य/ उपकरणे याद्वारे कशाप्रकारे व्यायाम करावा याबाबत संबंधीत पुरवठादार संस्थेने गावातील दोन ते तीन व्यक्तींना प्रशिक्षण द्यावे. सदर व्यक्ती याबाबत माहितीगार व्यक्ती (Resource Person) म्हणून कार्य करतील. ही पध्दत इतर स्वयंचलित उपकरणांबाबतही अवलंबविण्यात यावी.

**मत्तेचे हस्तांतरण :**

प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत झालेल्या बाबींची अंतिमत: देखभाल करण्यासाठी तयार झालेली मत्ता ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावी व तसा करारनामा ग्रामपंचायतीबरोबर करावा.

**निधी वितरण** :

१. प्रेरक प्रवेश उपक्रमासाठी प्राप्त होणारा निधी हा वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेमार्फत जिल्हा माहिती केंद्र तथा विकास कक्ष (WCDC) च्या स्तरावरून प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

२. ग्रामसभेने मंजूर केलेल्या गुणात्मक वृध्दींच्या (Value Addition) व नवीन कामांना प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांनी आवश्यकतेनुसार कामांसाठी ग्रामपंचायतीस निधी उपलब्ध करून दयावा .

३. तसेच ज्या ठिकाणी स्वयंसेवी संस्था (VOs) प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण म्हणून काम करत आहेत अशा ठिकाणी जिल्हा माहिती केंद्र तथा विकास कक्ष (WCDC) च्या स्तरावरून प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण यांना निधी उपलब्ध करून देण्यात यावा. त्यांना या परिपत्रकातील सर्व सूचना लागू राहतील. त्यांनीही वरील कार्यपध्दती अनुसरावी.

**प्रेरक प्रवेश उपक्रम कामांना मान्यता : काम मोजमापे, पूर्णत्वाचा दाखला , देयक अदा करणे .**

१. प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाने त्यांच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या तसेच पाणलोट विकास पथकातील (WDT) , ग्रामपंचायत, पाणलोट समितीच्या सहकार्याने प्रेरक प्रवेश उपक्रमातील ग्रामसभेने निश्चित केलेल्या कामांची अंमलबजावणी करावी.

२. सविस्तर प्रकल्प आराखडयात समाविष्ट असलेल्या कामासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी निश्चित केलेले तांत्रिक व आर्थिक मापदंड तसेच मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

३. EPA बाबत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांना राहतील.

४. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ग्रामसभेने ठरवून दिलेल्या प्रेरक प्रवेश उपक्रमाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे त्यांना तांत्रिक मंजुरी घेऊन पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणे कामांनुसार संबंधित ग्राम पंचायतीवर/ प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेवर बंधनकारक राहिल. कामांच्या अनुषंगाने त्या त्या क्षेत्राशी संबंधीत असलेले सक्षम अधिकारी तांत्रिक मान्यता

देतील**. सदर तांत्रिक मान्यता प्रस्ताव  संबंधीत विभागाकडे  प्रस्ताव प्राप्त झाल्यावर १५ दिवसांच्या आत निर्णय व्हावा.**

५. **साहित्य खरेदी** :  ग्रामसभेने सूचविलेल्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे, त्यांना तांत्रिक मंजुरी प्राप्त करणे , कामाच्या आवश्यकतेनुसार निविदा मागवून विहीत पध्दतीने कंत्राटदाराची नेमणूक करणे, मापन पुस्तकात (MB) कामाच्या नोंदी घेणे, कामावर देखरेख करणे व देयक अदा करण्यासाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा   यांचेकडे शिफारस करणे या सर्व बाबींची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांच्याकडे उपलब्ध असलेल्या  पाणलोट विकास पथकाची ,  कृषि सहाय्यक व  कृषि पर्यवेक्षक यांची राहिल.

**साहित्य खरेदीचे देयक अदायगी :** साहित्य खरेदीबाबत पाणलोट समितीने काम पूर्णत्वाची शिफारस केल्यानंतर प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा  यांनी संबंधीत यंत्रणेस/कंत्राटदारास देयके / रक्कम अदा करण्यात यावी.

ज्या ठिकाणी गुणात्मक वृध्दी व नवीन कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येतील त्या ठिकाणी गुणात्मक वृध्दीच्या कामांबाबत पंचायत समितीच्या तांत्रिक अधिका-याने / कनिष्ठ अभियंता यांनी ही कामे करावीत.

**प्रेरक प्रवेश उपक्रम : खर्च कालमर्यादा व छायाचित्रण**

१. प्रेरक प्रवेश उपक्रम पहिल्या एका वर्षात राबविण्यात यावेत.

२. प्रेरक प्रवेश उपक्रमामध्ये घेतलेल्या कामाची, काम करण्यापूर्वी, काम करताना (मध्य काल), काम झाल्यानंतरची स्थिती याबाबतचे फोटो, आवश्यकतेनुसार चित्रीकरण करण्यात यावे.

३. जर एका वर्षात प्रेरक प्रवेश उपक्रमावर खर्च केला नाही तर सदर रक्कम जलसंधारणाच्या उपचार (NRM Work) कामांवर खर्च करण्यात यावी, अशी कार्यपध्दती निश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे सदर अखर्चित रक्कम प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांनी  संबंधीत पाणलोट समिती यांच्याकडे वर्ग करावी.

**संनियंत्रण : अहवाल पाठविणे : अखर्चित रक्कम वर्ग करणे**

१. कामांचे स्टेजवार चित्रीकरण तसेच कामावर झालेला खर्च, उपयोगिता प्रमाणपत्र याबाबतचा दरमहा अहवाल प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांनी एमआयएस प्रणालीत नोंद घेण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा सदस्य सचिव व प्रकल्प व्यवस्थापक यांच्याकडे पाठवावा.

२. सदर निधी विहीत मुदतीत खर्च करण्याची व अखर्चित रक्कम पाणलोट कामांवर खर्च करण्यासाठी पाणलोट समिती यांच्याकडे तात्काळ वर्ग करण्याची जबाबदारी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांची राहिल.

३. हा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५०६१२३०५६८८२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Sahebrao Chavan

Digitally signed by Sunil Sahebrao Chavan
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RDD & WATER CONSERVATION DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sunil Sahebrao Chavan
Date: 2013.05.09 18:34:53 +05'30'

**(सुनील चव्हाण)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव

२. मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव

३. सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) निर्माण भवन, नवी दिल्ली.

४. सह सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) ब्लॉक क्र ११, ६ वा मजला सिजिओ कॉम्प्लेक्स, लोधीमार्ग, नवी दिल्ली.

५. मुख्य सचिव यांचे सहसचिव,

६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग

७. सर्व विभागीय आयुक्त,

८. आयुक्त (कृषि) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोटविकास यंत्रणा,महाराष्ट्र राज्य, पुणे,

९. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१०. सर्व उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय,

११. सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC),

१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सहअध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC),

१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( नरेगा) विभागीय आयुक्त कार्यालय.

१४. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण (सर्व विभाग)

१५. महासंचालक,माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

१६. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे सर्व प्रतिनिधी,

१७. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१८. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिकस्तर), पुणे,

१९. सर्व अधिक्षक अभियंता ,लघु पाटबंधारे मंडळ (स्थानिकस्तर),

२०. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,

२१. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,

२२. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,

२३. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

२४. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,

२५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

२६. सर्व मुख्य वनसंरक्षक तथा उपमहासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,

२७. सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण,

२८. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

२९. सर्व तालुका कृषि अधिकारी,

३०. सर्व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा(शासकीय/ अशासकीय संस्था/ स्वयंसेवी संस्था)

३१. सर्व सदस्य महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,

३२. सर्व उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

३३. जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.

**(परिशिष्ट- अ)**

**(शासन निर्णय क्र. एपाव्यका २०१२/प्र. क्र.१३२ /जल-८, दि.९ मे २०१३)**

**प्रेरक प्रवेश उपक्रमासंदर्भात दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेच्या झालेलया १५ व्या बैठकीत घ्यावयाच्या उपचारांना / कामांना मान्यता दिलेली आहे त्याची सूची.**

**अ. गुणात्मक वृध्दीची कामे (Value Addition Works)**

१) गावामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून बांधलेली समाजमंदिरे, सांस्कृतिक सभागृहे, सभामंडप, शाळा, अंगणवाड्या , ग्रामपंचायत कार्यालये व आरोग्य सेवेच्या इमारती यासारख्या सार्वजनिक इमारतीत विद्युत व्यवस्था, बैठकीसाठी फर्निचर व स्वच्छतागृह बांधणे व दुरूस्ती देखभाल यासारखी गुणात्मक वृध्दींची (Value Addition) कामे घेण्यास प्राथम्य क्रम राहिल. : मा.प्रधान सचिव यांचे पत्र क्र.एपाव्य २०११/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक २१ नोव्हेंबर, २०११.

**ब. नवीन कामे**

२) **दळणवळण व संपर्क**

- रस्ता / पुल दुरूस्ती / रपटा
- बोट
- फोन / पी.सी.ओ.
- माईकसेट / रेडियो / टिव्ही

३) **सामुहीक साधन संपत्ती निर्माण**

- पिण्याच्या पाण्याची उपलब्धता
- नवीन टयुबवेल्स
- नवीन विहीरी
- टयुबवेल / विहीरी दुरूस्ती
- अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठयाची दुरूस्ती

- विहीरीमध्ये हायड्रोफॅक्चरींग करणे
- पारंपारिक वॉटर हार्वेस्टिंग उपचारांच्या सुधारणा इ.
- पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताजवळील सिमेंट नाला बांध, माती नाला बांधांची दुरुस्ती, खोलीकरण, गाळ काढणे इ.
- प्राण्यांकरीता पाण्याचे हौद
- वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनासाठी संरक्षक जाळी

**४) सिंचन आणि मत्स्यव्यवसायाकरीता जलसंधारण निर्मिती**

- पाझर तलाव / गाव तलाव दुरूस्ती, गाळ काढणे, खोलीकरण, मजबुतीकरण

**५) सार्वजनिक स्वच्छता**

- नाली / शोषखडडे,
- स्नान / धोबी घाट
- सार्वजनिक स्वच्छतागृहे
- स्मशानभूमी
- बस थांबे (पिक अप शेड)

**६) शेती सहाय्य**

- शेतकी साधने व अवजारे
- मळणी यंत्र, कापणी यंत्र कडबा कुटी यंत्र इ.
- फवारणी यंत्रे
- सायलेज उभारणी
- कृषी सेवा केंद्र

**७) उत्पन्न निर्मिती साधने**

- मत्स्य व्यवसाय
- गांडूळ खत / कंपोस्ट खत/ घनकचरा व्यवस्थापन/ कचरा संकलन

- गाव बाजार ओटा/ मंडई
- अकाष्ठ वनउपज (NTFP) वाळविण्यासाठी ओटे
- मंडप उभारण्यासाठी साधने
- उत्पादन साठविण्यासाठी सार्वजनिक गोदाम

**८) ऊर्जा स्त्रोत**

- अपांरपारिक ऊर्जा साधने —
- सौर पथदिवे
- पवन चक्क्या
- सामाईक बायोगॅस
- ग्रामपंचायतीसाठी गॅस बत्ती व जनरेटर
- ग्रामपंचायतीच्या संग्राम केंद्रासाठी १ कि.वॅट सौरउर्जा/ सौरबीज निर्मिती प्रकल्प
- सौर कंदिल चार्जिंग स्टेशन

**९) आरोग्य**

- आरोग्य शिबीरे
- जनावरांसाठी आरोग्य / कृत्रिम रेतन शिबिरे
- व्यायाम शाळा साहित्य

**१०) शिक्षण**

- अंगणवाडीसाठी बाह्य खेळाचे साहित्य (Outdoor Play Equipment) (मा.प्रधान सचिव यांचे पत्र क्र.एपाव्य २०११/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक २१ नोव्हेंबर, २०११.)
- शैक्षणिक साहित्य
- अभ्यासिका- स्पर्धा परीक्षा पुस्तके (मा.प्रधान सचिव यांचे पत्र क्र.एपाव्य २०११/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक २१ नोव्हेंबर, २०११.)
- शाळा इमारत दुरूस्ती,जिल्हा परिषद शाळेसाठी बेंचेस, प्रयोगशाळा साहित्य
- ग्रंथालय